डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ,अकोला.
अर्थ प्रशासन विभाग.
पी ओ.कृषिनगर, अकोला-४४४ १०४(महाराष्ट्र)

सौ. विद्या सु. पवार
नियंत्रक

ई-मेल :comptroller@pdkv.ac.in

दुरध्वनी:- ०७२४२२५८४६९
फॅक्स :- ०७२४-२२५८८७३

जा.क्र.अप्रवि/अंलेप/ २८२६ /२०१७-१८ दिनांकः २३/०३/२०१८

प्रति,

.............................................
.............................................
.............................................
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला/ नागपूर

विषय : मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांच्या निर्णयानुसार वेतन व निवृत्ती वेतन मध्ये झालेल्या अतिप्रदानाच्या वसूली बाबत .

संदर्भ : १. मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर दि.१९ / २०.०७.२०११ याची क्र.४०७/२०१०
२. विद्यापीठ आदेश क्र.बीडीए/का.ब.प./क.स.स./२००९, दि.१०.०२.२०१२
३.मा. कुलसचिव, डॉ. पं. दे.कृ. वि., अकोला यांचे पत्र क्र.बीजीए/०२/१५५/२०१०, दि.१६/०४/२०१६.
४. या कार्यालयाचे पत्र क्र.अप्रवि/अलेप/१२१/२०१५-१६, दि०४/०५/२०१६.

उपरोक्त संदर्भांकीत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचीका क्र.४०७/२०१० नुसार १९/२०.०७.२०११ च्या निर्णयान्वये याचीका कर्ते व त्या आधारे घेतलेल्या संबंधीत अधिकारी कर्मचारी यांच्याकडून वेतन श्रेणी ६५००-१०५०० ऐवजी वरिष्ठ वेतन श्रेणी ७४५०-११५०० घेण्यात आली त्यामुळे वेतन व निवृत्ती वेतनामध्ये झालेल्या अतिप्रदानाविषयी महाराष्ट्र शासन कृषि व पदुम विभागाचे पत्र क्र.मकृवि-११०८/१४७६/प्र.क्र.१९५/६-अे, दि.३०.०६.२०१० नुसार व मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या निर्णय दि.१९ /२० .७.२०११ च्या निर्णयान्वये वेतन व निवृत्ती वेतन मध्ये झालेल्या अतिप्रदान रकमेची वसुली करणेबाबत आदेशीत केले आहे.

तरी आपणास याद्वारे पुन्हा सुचीत करण्यात येते की, आपल्या विभागात/ आस्थापनेवर कार्यरत किंवा सेवानिवृत्त झालेले **वरिष्ठ संशोधन सहायक** ज्यांनी रु.६५००-१०५०० ऐवजी वरिष्ठ वेतन श्रेणी ७४५०-११५०० / हि वरिष्ठ पदावर ५ वर्ष पूर्ण न होता प्रदान करण्यात आली अशा प्रकरणी वेतन व

निवृत्ती वेतनामध्ये झालेल्या अतिप्रदानाविषयी वसुली तसेच काही प्रकरणी कालबध्द पदोन्नती तसेच कनिष्ठ कर्मचा-याचे वेतन वाढवून (Steping up ) देण्या प्रकरणी मागील वेतन आयोगातील वरिष्ठ वेतन श्रेणी ५ वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच मंजूर केलेले आहे अशा प्रकरणी सुध्दा वसुलीची कार्यवाही करावी व सेवापुस्तक पडताळणी करुन पुन्हा वेतन निश्चिती करुन त्यांना अतिप्रदान झालेल्या एकत्रित रकमेचा अहवाल तात्काळ वित्त विभागास सादर करण्याविषयी संदर्भ क्र.४ अन्वये सुचविले होते परंतु अद्याप पर्यंत वेतन व निवृत्तीवेतनामध्ये झालेल्या वसुली विषयी माहिती या कार्यालयास देण्यात आलेली नाही, त्यामुळे महाराष्ट्र शासन कृषि व पदुम विभाग व मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांना एकत्रित रकमेचा अहवाल सादर करता आलेला नाही, तरी उपरोक्त विषयी तात्काळ कार्यवाही करुन संबंधीत विषयी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

या संबंधीत कार्यवाहीस विलंब झाल्यास संबंधीत आहरण व सवितरण अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रतिलिपी :

१) कुलगुरु यांचे तांत्रिक सचिव,डॉ. पं.दे.क.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहितीस्तव सादर.

२) मा.कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीस्तव सादर.

३) वेतन व लेखाधिकारी,डॉ. पं.दे.क.वि.,अकोला / नागपूर यांना सुचित करण्यात येते की, संबंधीत वसूलीबाबत जे वरिष्ठ संशोधन सहायक ज्या कार्यालयातून / विभागातून सेवा निवृत्त झाले त्या विभागांना संबंधीत विषयी कार्यवाही करण्याविषयी निर्देशीत करावे.

नियंत्रक